सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## विधानपरिषद निवडणुकीच्या हालचालींना वेग!

## भाजपने नावे पाठवली, मविआतर्फे उद्धव ठाकरे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

बारामती, राहुरी पोटनिवडणुकीचे मतदान आटोपले असताना आता विधान परिषदेच्या १० जागांसाठीच्या निवडणूक हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या कोअर कमिटीने एकास पाच फॉर्म्युल्याने केंद्रीय भाजपकडे नावे पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीला काँग्रेसने आधीच समर्थन दिलेले असताना खा. सुप्रिया सुळे यांनीही ठाकरे यांना गळ घातली आहे. आमदारकीसाठी एक नाव ठरविताना राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची मोठीच कसरत होणार आहे. केंद्रीय भाजपशी चर्चा करून नावे अंतिम करण्याचा अधिकार 'वर्षा'वरील बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांना देण्यात आला.

### भाजपची संभाव्य नावांची यादी

डॉ. राजीव पोतदार, संजय केणेकर, सुनील कर्जतकर, माजी आमदार प्रज्ञा सातव, राजा राऊत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, सुरेश हळवणकर, निलय नाईक, प्रकाश पाटील देवसरकर तसेच माजी मंत्री अनंतराव देशमुख. याशिवाय गणेश हाके, नीता केळकर, राजेश पांडे, डॉ. आरती फुसाटे, अतुल काळसेकर, माधव भंडारी, माधवी नाईक, विजय चौधरी, लक्ष्मण सावजी, सुरेश बनकर, अर्चना पाटील चाकूरकर आणि दयाशंकर तिवारी.

### सपकाळ मातोश्रीवर; सुप्रियांची एक्स पोस्ट

उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर निवडून जाण्याची शक्यता वाढली आहे. काँग्रेसने आधीच त्यांना पाठिंबा दिलेला होता. राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी, ठाकरे यांनीच विधान परिषद लढावी, ही आमच्या पक्षाची आग्रहाची विनंती आहे.

ते राज्यातील अनुभवी आणि ज्येष्ठ नेते आहेत. त्याचा फायदा राज्याला आणि सभागृहाला नेहमीच होत राहील, असा आमचा विश्वास आहे. मविआने त्यांच्या नावाचा सकारात्मक विचार करावा, असे एक्स पोस्टवर म्हटले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मातोश्रीवर जावून उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली.

### अजित पवार गटाकडे जागा एक, इच्छुक मात्र अनेक

- आमदारकीचा एक उमेदवार ठरविताना इच्छुकांच्या गर्दीमुळे अजित पवार गटाच्या अध्यक्ष व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व पक्षातील प्रमुख नेत्यांची डोकेदुखी वाढणार आहे. 'दादानिष्ठ' उमेदवारच द्यावा, असा पक्षात सूर आहे. या एका जागेसाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये राजेंद्र जैन, अनिकेत तटकरे, आनंद परांजपे, सुनील टिंगरे, उमेश पाटील, विक्रम संजय काकडे यांचा समावेश आहे.

– माजी आमदार राजेंद्र जैन हे प्रफुल पटेल यांचे कट्टर समर्थक आहेत. तर अनिकेत तटकरे हे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे चिरंजीव आधीही विधान परिषदेवर होते. पुण्यातील पोर्शे कार अपघातप्रकरणी वादग्रस्त ठरलेले आणि विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेले सुनील टिंगरेही या जागेसाठी प्रयत्नशील आहेत.

### संधी मिळतेच असे नाही

भाजपच्या प्रदेश कोअर कमिटीने जी नावे दिल्लीला पाठविली त्यापेक्षा वेगळेच नाव दिल्लीहून दिले जाऊ शकते, असा अनुभव आहे. त्यामुळे कोअर कमिटीने दिलेल्या नावांमधूनच सहा नावे येतील याची शाश्वती नाही. मात्र, सहापैकी तीन नावे ही प्रदेशाने सुचविलेल्यांतून असू शकतील.

---

## महायुती सरकारवर पटोलेंचा हल्लाबोल

## चार आयएएस अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण उघड करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर** – महायुती सरकारमध्ये भ्रष्टाचाराचा कळस गाठला असून, चार आयएएस अधिकाऱ्यांच्या कथित गैरव्यवहाराचे प्रकरण लवकरच उघड करणार असल्याचा इशारा काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी दिला. नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी राज्य सरकार, केंद्र सरकार तसेच भाजपावर विविध मुद्द्यांवरून जोरदार टीका केली.

### भाजपची भूमिका दुटप्पी

पटोले यांनी भारतीय जनता पक्षावर महिलांच्या प्रश्नांबाबत दुटप्पी भूमिका घेतल्याचा आरोप केला. २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. खोटं बोला पण रेटून बोला हीच भाजपाची कार्यपद्धती असल्याची टीका करत सत्तेचा माज त्यांच्या वर्तनातून दिसत असल्याचा आरोप त्यांनी केला. महिलांच्या सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर राजकारण केले जात असल्याचाही दावा त्यांनी केला.



राज्यातील प्रशासनात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढल्याचा आरोप करत पटोले यांनी काही वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांवर थेट निशाणा साधला. जमीन व्यवहारांमध्ये गैरप्रकार होत असल्याचे सांगत संबंधित अधिकाऱ्यांविरोधातील कागदपत्रे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावर कारवाई न झाल्यास हे प्रकरण विधानसभेत उघड करण्याचा इशाराही त्यांनी दिला. मंत्र्यांमध्ये मलई खाण्याची स्पर्धा सुरू असल्याची टीका करत सरकारमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंबईतील रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयावरही त्यांनी आक्षेप घेतला. भाषा, धर्म आणि जात यांच्या आधारावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. मराठी भाषा शिकणे आवश्यक असले तरी ती सक्तीने लादणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सक्तीऐवजी प्रोत्साहनाचा मार्ग स्वीकारावा, असेही त्यांनी सुचवले.

पटोले यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या सन्मानाच्या मुद्द्यावरही प्रश्न उपस्थित केले. परदेशी नेत्यांकडून भारताबद्दल अवमानकारक वक्तव्य झाल्यास त्यावर ठोस भूमिका घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. राष्ट्रीय स्वाभिमानाच्या मुद्द्यावर सरकारने स्पष्ट आणि ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

---

## पावसाळ्यात शाळा सुरक्षित राहणार का? राज्य सरकारचा मोठा निर्णय

## १५ मे पूर्वी इमारतींच्या तपासणीचे कडक आदेश!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुबंई–** शाळा म्हटली की शाळेची वास्तू ही महत्वाची बाब ठरते. ती भव्य व आकर्षक असून पुरेशी नाही. तर विद्यार्थी हितास्तव ती सर्व दृष्टीने सुरक्षित असली पाहिजे. म्हणजे वर्ग खोल्या, स्वच्छता गृह, स्वयंपाकघर आदी, वीज पुरवठा व अन्य दृष्टीने भक्कम असणे गरजेचे आहे. अन्यथा कधी धोका निर्माण होवू शकतो.

मान्सूनच्या आगमनापूर्वी राज्यातील सर्व सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कंबर कसली आहे. राज्यातील





सर्व शाळांच्या इमारती, वर्गखोल्या, स्वयंपाकगृह आणि स्वच्छतागृहांची मान्सूनपूर्व तपासणी करण्याचे आदेश 'महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद' (चझडझ) मार्फत देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, ही सर्व प्रक्रिया १५ मे पूर्वी पूर्ण करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी 'स्ट्रक्चरल ऑडिट' अनिवार्य ठरते. प्रतिवर्षी पावसाळ्यापूर्वी आणि नंतर शाळांच्या इमारतींची तपासणी करणे ही एक आवश्यक सुरक्षा प्रक्रिया आहे. या वर्षीच्या पावसाळ्यापूर्वी म्हणजेच १५ मे पर्यंत शाळांची 'स्ट्रक्चरल ऑडिट' (संरचनात्मक तपासणी) पूर्ण करावी लागणार आहे. यामध्ये इमारतीची मजबूती तपासणे, छताची गळती रोखण्यासाठी जलरोधक उपाययोजना करणे आणि अतिशय जुन्या किंवा धोकादायक इमारती ओळखणे या बाबींचा समावेश आहे. वापर तात्काळ थांबवून विद्यार्थी आणि शिक्षकांना पर्यायी सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. धोकादायक इमारतींवर कडक कारवाईचे निर्देश आहेत.ज्या इमारती धोकादायक किंवा मोडकळीस आल्या आहेत, त्यांच्या सभोवताली काटेरी कुंपण घालून तिथे कोणालाही प्रवेश मिळणार नाही याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे.

---

## राघव चड्ढा, हरभजनसिंग भाजपात!

### आम आदमी पार्टीत उभी फूट, राज्यसभेच्या १० पैकी ७ खासदारांचा पक्षाला 'राम-राम'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

दिल्लीच्या राजकारणात आज मोठा राजकीय भूकंप झाला आहे. 'आम आदमी पक्षा'चे संस्थापक सदस्य आणि राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी पक्ष सोडल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे, त्यांनी पक्षातील दोन-तृतीयांश खासदारांसोबत भाजपमध्ये विलीन होणार असल्याचे जाहीर केले आहे. या खासदारांमध्ये क्रिकेटर हरभजनसिंग, संदीप पाठक यांच्यासह ७ खासदारांचा समावेश आहे.

राघव चड्ढा यांनी आज संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासह पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सांगितले की, राज्यसभेतील आम आदमी पक्षाच्या दोन-तृतीयांश सदस्यांनी घटनात्मक तरतुदीनुसार भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी त्यांनी पक्षावर आपल्या मूळ मूल्यांपासून भरकटल्याचा आरोप केला. चड्ढा म्हणाले की, ज्या पक्षासाठी मी १५ वर्षे मेहनत घेतली, तो आता आपल्या मूलभूत तत्त्वांपासून दूर गेला आहे. हा पक्ष देशहिताऐवजी



वैयक्तिक फायद्यासाठी काम करत आहे.

चड्ढा पुढे म्हणाले, राज्यसभेत 'आप'चे १० खासदार आहेत आणि त्यापैकी दोन-तृतीयांशहून अधिक खासदार या बाबतीत आमच्यासोबत आहेत. त्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत आणि आज सकाळीच आम्ही ते स्वाक्षरी केलेले पत्र व संबंधित कागदपत्रे राज्यसभेच्या सभापतींकडे सादर केली आहेत. मी चुकीच्या पक्षात असल्याची जाणीव गेल्या काही वर्षांत होत होती.

त्यामुळे आज मी पक्षापासून दूर होत असून जनतेच्या जवळ जात आहे. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाहांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, आम्ही आमचा राजकीय प्रवास पुढे नेताना देशासाठी काम करू, असेही सांगितले.

**राघव चड्ढांसोबत कोणते खासदार आहेत?**

हरभजनसिंग, स्वाती मालीवाल, विक्रमजीत सिंह सहनी,राजेंद्र गुप्ता, संदीप पाठक, अशोक मित्तल

**राज्यसभेतील 'आप'चे एकूण सदस्य–** राघव चड्ढा (पंजाब), संदीप पाठक (पंजाब)

संजय सिंह (दिल्ली) अशोक मित्तल (पंजाब), हरभजन सिंग (पंजाब), विक्रमजीत सिंह साहनी (पंजाब), बलबीर सिंह सीचेवाल (पंजाब), स्वाती मालीवाल (दिल्ली), एन. डी. गुप्ता (दिल्ली), संजीव अरोरा (पंजाब)

---

## पनीर खाणाऱ्यांनो सावधान, सरकारने घेतला मोठा निर्णय

## हॉटेलवाल्यांवर होणार कारवाई

### १ मेपासून नवीन नियमांची अंमलबजावणी
### मेनू कार्डमध्ये स्पष्ट उल्लेख बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

महाराष्ट्रानंतर आता केंद्र सरकारने 'आर्टिफिशियल पनीर' म्हणजेच चीज अनॅलॉगवर मोठा निर्णय घेतला आहे. फुड सेफ्टी अँड स्टँडर्ड अथोरिटी ऑफ इंडियाच्या (ऋडड-ख) नियमांनुसार हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये पनीरच्या नावाखाली स्वस्त पर्याय विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली



जाणार आहे. १ मेपासून या नियमांची अंमलबजावणी होणार असून ग्राहकांची फसवणूक रोखण्यावर भर दिला जाणार आहे.

पनीर म्हणून चीज अनॅलॉग अर्थात आर्टिफिशियल पनीर विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या आदेशानंतर केंद्र शासनाकडून देखील अंमलबजावणीचे आदेश दिले. भाजप आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी ही माहिती दिली. देशातील हॉटेल, रेस्टॉरंट, कॅटर्स, फास्ट फूड चालकांना केंद्र सरकारने याबाबत आदेश दिले. एफएसएसएआयकडून कारवाईसाठी परिपत्रक जारी करण्यात आले.विधीमंडळ अधिवेशनात विक्रमसिंह पाचपुते यांनी आर्टिफिशियल पनीरचा मुद्दा मांडला होता. १ मे पासून पनीर ऐवजी चीज अनॅलॉग म्हणून मेनू कार्डमध्ये बदल करावा लागणार आहे. मेनू कार्डमध्ये बदल न केल्यास एफडीए आणि एफएसएसएआयकडून कारवाई केली जाणार आहे. नागरिकांना देखील पनीर खाताना ते आर्टिफिशियल पनीरसारखे लागले तर त्यांनी तात्काळ तक्रार करण्याचे आवाहन केले जात आहे.

---


## प्रकाशकाला केलेल्या शिवीगाळबद्दल दिलगिरी व्यक्त करतो पण...

### संजय गायकवाडांना उपरती, भूमिकेवर ठाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ बुलढाणा–** शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी दिवंगत गोविंद पानसरे लिखीत शिवाजी कोण होता या पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या प्रशांत आंबी यांना फोन करुन शिवागाळ केली होती, तसेच धमकी देत शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख का करतो, असे म्हणत धमकीही दिली होती. मात्र, केवळ पुस्तकाचे कव्हर पेज पाहून संतापलेल्या संजय गायकवाड यांनी पुस्तक वाचले नसून त्यांना छत्रपती शिवराय कळालेच नाहीत, असे म्हणत समाज माध्यमांवरुन त्यांच्यावर टीकेची झोड उठली. राजकीय नेत्यांनी देखील त्यांच्याबद्दल सावध भूमिका घेतल्यानंतर आता त्यांनी संबंधित प्रकाशक आंबी यांना केलेल्या शिवीगाळ प्रकरणाबद्दल दिलगीरी व्यक्त केली, पण छत्रपती शिवाजी महाराज असा उल्लेख करण्याच्या मतावर आपण ठाम असल्याचंही त्यांनी म्हटलं.

शिवाजी कोण होता या पुस्तिकेचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना आमदार संजय गायकवाड यांनी फोनवरुन अश्लील भाषेत शिवीगाळ केली होती. सोशल मीडियावर या घटनेवरुन संजय गायकवाड यांच्या भूमिकेवर अनेक प्रश्न विचारण्यात आले. तर, प्रकाशक प्रशांत आंबी यांनीही पोलिसात जाऊन तक्रार देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांची तक्रार घेण्यात आली नाही. तसेच, महायुतीमधील राजकीय नेत्यांनी देखील त्यांच्या फोनबद्दल सावध भूमिका घेतली होती. अखेर, शिवीगाळीच्या घडल्या प्रकारा बद्दल त्यांनी आता दिलगिरी व्यक्त केलीय. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख नेहमी सन्मानपूर्वकच व्हावा, ही आपली ठाम भूमिका असल्याचेही संजय गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे.

शिवाजी कोण होता, या पुस्तकातील एकेरी उल्लेखांवर आक्षेप घेत त्यांनी हा विषय





वादाचा नसून संस्कार आणि आदराचा असल्याचे मत व्यक्त केले. अलीकडील वादात आपल्या तोंडून काही अयोग्य शब्द गेले असल्याची जाणीव व्यक्त करत मनापासून दिलगिरीही व्यक्त करतो. तसेच, छत्रपती शिवरायांविषयी निष्ठा आणि सन्मान कायम ठेवत संबंधितांनी योग्य ती दुरुस्ती करावी. ज्यांना बुलढाण्यात येऊन हे पुस्तक वाचायचे आहे, त्यांनी ते वाचावे पण एकेरी उल्लेख न करता छत्रपती शिवाजी महाराज असाच उल्लेख करावा. महाराजांचा अपमान करुन करोडो हिंदूंचा अपमान करू नये अशी अपेक्षा सुद्धा त्यांनी व्यक्त केली.

## संपादकीय ......

# मोर्चा, आंदोलन, सभा या साधनांचा वापर करताना

राजकारणात लोकांचा आवाज ऐकला जातो, असे नेहमी सांगितले जाते; पण काही वेळा तो आवाज ऐकूनही न ऐकल्यासारखे केले जाते. मात्र, कधी कधी तोच आवाज इतका तीव्र होतो की तो केवळ एका घटनेपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवर आरसा धरतो. मुंबईतील जांबोरी मैदान परिसरात महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या भाजपच्या जनआक्रोश मोर्चादरम्यान घडलेली घटना याचेच ठळक उदाहरण म्हणावे. एका सामान्य महिलेचा संताप, तिचा स्पष्ट आणि निर्भीड सूर आणि त्यातून उमटलेला संदेश याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या घटनेत मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर त्या महिलेचा व्यक्त झालेला संताप हा व्यक्तीविरोधातील नव्हे, तर तो सर्वपक्षीय राजकीय प्रवृत्तीविरोधातील होता. मोर्चा, आंदोलन, सभा ही लोकशाहीची साधने आहेत, याबद्दल दुमत नाही. पण या साधनांचा वापर करताना सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा विचार केला जातो का, हा मूलभूत प्रश्न या प्रसंगातून पुढे आला. रस्ते अडवून, वाहतूक खोळंबा करून, लाखो लोकांच्या रोजच्या आयुष्यात अडथळे निर्माण करून जर राजकीय शक्तिप्रदर्शन केले जात असेल, तर त्यातून निर्माण होणारा रोष अपरिहार्य आहे. आजच्या काळात सोशल मीडियाची ताकद अशी आहे की, एका क्षणात एखादी घटना संपूर्ण देशभरच नव्हे तर जगभर पोहोचते. या महिलेचा व्हिडिओही तसाच वार्यासारखा पसरला. पण या व्हिडिओचे वैशिष्ठ्य हे होते की, तो केवळ व्हायरल झाला नाही, तर त्याला लोकांचा प्रचंड प्रतिसादही मिळाला. लोकांनी त्या महिलेच्या भावना समजून घेतल्या, तिच्या संतापाशी स्वत:ला जोडले. मात्र, या प्रतिक्रियेचा अर्थ काही जणांनी आपल्या सोयीप्रमाणे लावण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षांनी या घटनेचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला, ही बाब लपून राहिलेली नाही. भाजपविरोधात लोकांमध्ये असलेला रोष म्हणून या घटनेला रंगवण्याचा प्रयत्न झाला. पण ही मांडणी जितकी सोयीस्कर, तितकीच अपुरी आहे. या संतापामागे कोणत्याही विशिष्ट पक्षाविरोधातील भावना नव्हती, तर ती होती व्यवस्थेच्या त्या वृत्तीविरोधातील प्रतिक्रिया, जिथे जनतेच्या सोयीपेक्षा राजकीय कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाते.

ही बाब केवळ सत्ताधार्यांपुरती मर्यादित नाही. काँग्रेस असो, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस असो, उबाठा पक्ष असो किंवा इतर कोणतेही राजकीय गट असोत. सर्वांनी वेळोवेळी असे मोर्चे, आंदोलने आणि रस्ते अडवण्याचे प्रकार केले आहेत. त्यामुळे या घटनेचा वापर करून केवळ एका पक्षावर टीका करणे म्हणजे मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष करणे होय. प्रश्न कोणाचा मोर्चा आहे, हा नाही. तर तो कसा काढला जातो आणि त्याचा परिणाम कोणावर होतो, असा आहे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आहे, पण त्याचवेळी नागरिकांच्या हक्कांचाही आदर राखणे आवश्यक आहे. रस्त्यावर अडकलेल्या रुग्णवाहिका, प्रसव वेदनेत तळमळणारी महिला, वेळेवर पोहोचू न शकलेले कामगार, परीक्षेला उशीर झालेली मुले या सगळ्यांचा विचार कोण करणार? राजकीय पक्षांनी आपल्या शक्तिप्रदर्शनाच्या नादात या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यामुळेच हा उद्रेक त्या महिलेच्या संतापातून व्यक्त झाला. कधी तरी हे होणारच होते. सत्ताधारी म्हणून भाजपकडून अधिक जबाबदारपणाची अपेक्षा आहे. सत्ता ही केवळ अधिकार देत नाही, तर ती उत्तरदायित्वही वाढवते. अशा वेळी जर त्यांच्या कार्यक्रमांमुळेच नागरिकांना त्रास होत असेल, तर त्याचे गांभीर्य अधिकच वाढते. प्रशासनावर प्रभाव असताना, पर्यायी मार्गांची व्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सोयींचे नियोजन करणे शक्य असते. पण ते न करता जर केवळ गर्दी जमवणे आणि शक्ती दाखवणे यालाच प्राधान्य दिले गेले, तर तो लोकशाहीचा अपमान ठरतो. त्याचवेळी, विरोधी पक्षांची भूमिकादेखील तितकीच महत्त्वाची आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले आणि उबाठाचे नेते संजय राऊत या प्रकरणात भाजपवर टीका करण्यात धन्यता मानत आहेत. सत्ताधार्यांवर टीका करणे हे त्यांचे कर्तव्य असले तरी राजकीय नेते म्हणून आपण सगळे एकाच पाण्यातील मासे आहोत याचा त्यांना विसर पडत आहे. केवळ एखाद्या घटनेचा राजकीय फायदा उचलण्याच्या नादात जर मूळ मुद्दाच बाजूला पडला, तर ती टीका प्रभावहीन ठरते. या प्रकरणातही तेच झालेले दिसते. त्या महिलेचा राग समजून घेण्याऐवजी, तो आपल्या राजकीय फायद्यासाठी वापरण्याची घाई दिसून आली.

# जिल्हा नियोजन समितीवर बारा सदस्यांची निवड

## दोन आमदारांसह भाजपा, शिवसेना व युवा स्वाभिमानच्या पदाधिकाऱ्यांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** :जिल्हा नियोजन समितीमध्ये चार नामनिर्देशित व आठ विशेष निमंत्रित सदस्यांची नियुक्ती पालकमंत्र्यांच्या शिफारसीने करण्यात आली आहे. या समितीवर आ. प्रताप अडसड, आ. प्रविण तायडे यांच्यासह तज्ञ सदस्य म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख व माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय समितीमध्ये भाजपा, युवा स्वाभिमान व शिवसेना शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.जिल्हा वार्षिक योजनांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हा नियोजन समिती महत्वाची असून पालकमंत्री समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. शिवाय जिल्हाधिकारी सचिव आहेत. या समितीवर विधीमंडळ सदस्यांमधून आ. प्रताप अडसड, आ. प्रविण तायडे, वाशिवाय सदस्य म्हणून रविराज देशमुख आणि प्रभुदास भलावेकर यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विशेष निमंत्रित सदस्यांमध्ये डॉ. नितीन धांडे, निवेदिता दिघडे, सुनील खराटे, आशिष कावरे, विनोद जायलवाल, संतोष बद्रे, श्याम देशमुख व आशिष धर्माळे यांची निवड करण्यात आली आहे.

नागरी सेवा दिन आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान'सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रमांतर्गत

# विभागीय आयुक्त कार्यालयास राज्यस्तरीय पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती** राज्य शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानात सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रमांतर्गत 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' विकसित केल्यासाठी तृतीय पुरस्कार विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्ग कक्षाच्या सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई येथे मंगळवारी (ता. २१ एप्रिल) प्रदान करण्यात आला. नागरी सेवा दिन २०२६ आणि 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२५-२६' अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळा २१ एप्रिल रोजी, मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे झाला. कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य




सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी यावेळी उपस्थित होते. श्रीमती पाथरे यांच्यासह मागासवर्ग कक्षाचे सहा.महसूल अधिकारी सुजन सोळंके, दत्तात्रय हातेकर यांनी सदर पुरस्कार स्विकारला.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षाव्दारे विकसित करण्यात आलेल्या 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' मुळे रोस्टर्स तयार करण्याची प्रक्रिया सुलभ झाली आहे. यामुळे शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थामधील कर्मचाऱ्यांची आरक्षणनिहाय अचूक माहिती तयार होत असून १०० बिंदूनामावली नोंदवही संगणीकृत पध्दतीने संबंधित कार्यालयास उपलब्ध होते. या सॉफ्टवेअरमध्ये कार्यालयाच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रर्वगानुसार सर्व माहिती विहित नमून्यात नोंदविली जाते. तसेच यात नियुक्ती प्रर्वगाचे आदेश, जात वैधता प्रमाणपत्र आदी आवश्यक दस्तावेज अपलोड करण्याची सुविधा दिली असल्यामुळे अचूक डेटा तयार होतो.

प्रत्येक भरती वर्षात बिंदूनामावली अद्ययावत करावयाची असल्यामुळे पुन्हा पुन्हा सर्व कर्मचाऱ्यांची माहिती गोळा करणे व नोंदवहीत लिहून काढण्याची आवश्यकता राहत नाही. बिंदुनामावलीत बिंदूच्या क्रमानुसार १ बिंदू क्रमांक नोंद झाल्यानंतर लगेच दुसरा बिंदू कार्यरत होतो, त्यामुळे बिंदूचा क्रम चुकत नाही. या 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' मुळे अमरावती विभागातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थामध्ये नोकरभरती व पदोन्नती, अनुकंपाची प्रकरणे लवकर मार्गी लागण्यासाठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

### अमरावती महापालिकेला 'कूल रुफ' संकल्पनेला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार

महानगरपालिका स्तरावरून थेट प्रस्तावअंतर्गत 'कूल रुफ'करिता तत्कालिन आयुक्त सौम्या शर्मा आणि अमरावती मनपा आयुक्त वर्षा लड्ढा यांना प्रथम पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

शहरातील नागरिकांचे घर, व्यापारी संकुल, छोटे-मोठे व्यवसायांचे गाळे यावर उन्हाळ्यातील तापमान कमी करण्याच्या उद्देशाने कूल रुफ बसविण्याचा उपक्रम महापालिकाकडून राबविण्यात आला असून यास उत्स्फूत प्रतिसादही मिळाला. या उपक्रमांतर्गत घराच्या किंवा दुकानांच्या छतावर तापमान कमी करण्याचे दृष्टीने सोलर यंत्रणा बसविने, उन्हाची तीव्रता कमी करणारे कलर लावणे तसेच मोझॅक स्टाईल्स लावणे आदी बाबींचा समावेश आहे.

# एमएमसी निवडणुकीसाठी २६ एप्रिलला मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (एमएमसी)च्या ९ सदस्यांच्या निवडीसाठी जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार अमरावती जिल्ह्यात २६ एप्रिल २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्ह्यातील एकूण २ हजार ५६५ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक मतदारांसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून, मतदान सुरळीत व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.मतदानासाठी श्रीकृष्ण पेठ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जिल्हा स्त्री सामान्य रुग्णालय परिसर) येथे ४ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. फिजीऑलॉजी प्रॅक्टिकल हॉल क्रमांक १ व २ मध्ये प्रत्येकी दोन केंद्रे उभारण्यात आली असून, मतदारांच्या अनुक्रमांकानुसार केंद्रांचे विभाजन करण्यात आले आहे. केंद्र क्रमांक १ मध्ये १ ते

## अमरावतीत ४ केंद्रांवर तयारी पूर्ण



६४४, केंद्र क्रमांक २ मध्ये ६४५ ते १२८२, केंद्र क्रमांक ३ मध्ये १२८३ ते १९२५ आणि केंद्र क्रमांक ४ मध्ये १९२६ ते २५६५ या मतदारांना मतदानाची सोय करण्यात आली आहे.२६ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार असून प्रत्येक मतदाराला एकूण ९ मते देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने ५ मतदान पथके नियुक्त केली असून या पथकांमध्ये एकूण २५ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण पूर्ण झाले असून दुसरे प्रशिक्षण २५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर सर्व कर्मचारी आवश्यक निवडणूक साहित्य घेऊन मतदान केंद्रांकडे रवाना होणार आहेत.निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत असून मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. मतदारांना सुलभ व जलद मतदान करता यावे यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाही प्रक्रियेला बळकटी द्यावी, असे आवाहन केले आहे. तसेच शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.


# कामात दिरंगाई खपवून घेणार नाही

## सीईओंचा आढावा बैठकीत इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील सर्व कामे टार्गेट बेस पद्धतीने नियोजनबद्ध, वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत. कामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नसून, प्रत्येक अधिकाऱ्याने आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यकारी समितीच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिले. यावेळी सीईओंनी जिल्ह्यातील आरोग्यसेवांची गुणवत्ता, विविध योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित कामे तसेच आगामी कालावधीतील नियोजन यांचा सखोल आढावा या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण परिसे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार तसेच ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय अधिकारी, जिल्ह्यातील चौदाही तालुक्यांचे तालुका आरोग्य अधिकारी, विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे जिल्हास्तरीय समन्वयक व कार्यक्रम प्रमुख उपस्थित होते. सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांच्या विभागांतील प्रगतीचा सादरीकरणाद्वारे आढावा घेण्यात आला. बैठकीमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सुरू असलेल्या विविध कार्यक्रमांची सद्य:स्थिती, उद्दिष्टे व प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः कामकाजातील विलंब, बांधकाम प्रकल्पांची संथ गती, काही योजनांतील अपूर्ण कामे तसेच आरोग्य विभागातील मनुष्यबळाची कमतरता याकडे लक्ष वेधण्यात आले. बांधकाम विभागाच्या कामकाजाबाबत विशेष आढावा घेण्यात आला. संबंधित उपअभियंत्यांनी कामाची गती वाढवून पुढील तीन महिन्यांत अपेक्षित सुधारणा साध्य करावी, अन्यथा बदलीची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.



राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कामे टार्गेट बेस पद्धतीने वेळेत आणि गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत, असे निर्देश बैठकीत देण्यात आले. शिवाय गती, गुणवत्ता आणि स्थानिक सहभागाच्या बळावरच आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल.

**सत्यम गांधी,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

# जंगली डुकराच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

## मदतीपासून वंचित, पंचनामा व शस्त्रक्रियेनंतरही वनविभागाला संशय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४पथ्रोट**

शेती कामाला जात असताना अचानकपणे जंगली डुकराने केलेल्या हल्ल्यात शेतकरी प्रज्वल पेढेकर (रा. शिंदी बुद्रूक) यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. ही घटना शिंदी शेतशिवारात घडली होती. सदर घटनेनंतर वनविभागाने पंचनामा केला. पायावर शस्त्रक्रियाही झाली. त्यानंतर आर्थिक मदत मागताना वनविभागाने संशय व्यक्त केल्याने सध्या हे प्रकरण मागील आठ महिन्यांपासून चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहे. शेतकरी अरुण सारडे यांच्या शेतामध्ये शेतीकामाला आपल्या सहकाऱ्यांसोबत जात असताना नजीकच्या नाल्यातून अचानकपणे एक मोठे जंगली डुक्कर धावत आले व त्याने प्रज्वल पेढेकर या युवकाच्या डाव्या पायाला जबरदस्त धडक दिली. त्यावेळी इतर सहकाऱ्यांच्या साह्याने जंगली डुकराला हाकलून लावल्यामुळे मोठा अनर्थ टळला. जखमी प्रज्वल यांना परतवाडा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याठिकाणी एमआर काढल्यानंतर त्यांच्या पायाचे



तीन लेगामेंट तुटले असल्याने ऑपरेशन करण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला होता. यादरम्यान त्यांनी वनविभागाकडे अर्ज दाखल करून नियमानुसार आर्थिक मदतीची मागणी केली होती. त्यानुसार राउंड ऑफिसर सुधीर हाते यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आर्थिक मदतीसाठी सदरचे प्रकरण वरिष्ठ कार्यालयात पाठविले होते. अमरावती याठिकाणी शस्त्रक्रियेसाठी तीन लाख रुपयांपर्यंतचा खर्च केल्यानंतर जवळपास चार महिने जखमी प्रज्वल यांना जाग्यावरच राहावे लागले होते. त्यानंतर त्यांनी अमरावती येथील वनविभागाचे सहायक वनसंरक्षक श्री. देसाई यांच्याकडे आर्थिक मदतीसाठी संपर्क केला. तेव्हा ऑनलाइन करून प्रकरण आर्थिक मंजुरकरिता सादर करतेवेळी 'नॉट फाऊंड ४०४' एरर येत असल्याने जवळपास आठ महिन्यांपर्यंत सदरचे प्रकरण ऑनलाइन झाले नव्हते. त्यानंतर वारंवार वनविभागाशी संपर्क सुरू ठेवल्यामुळे अखेर वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यामार्फत प्रकरण ऑनलाइन करून मंजुरीकरिता पाठविण्यात आले होते. मग मागील दोन महिन्यांपासून आर्थिक मदत मागण्यासाठी प्रज्वल पेढेकर व त्यांचे वडील केशव पेढेकर यांनी सहायक वनसंरक्षक वनविभाग अमरावती यांचे कार्यालय गाठले. परंतु चौकशीची कारणे देत सद्यस्थितीत पीडित शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळालेली नाही.

# धावत्या रेल्वेगाडीतून पडून प्रवासी ठार

## बडनेरा-अकोला रेल्वेमार्गावरील घटना, मालगाडीखाली आल्याने महिला गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** धावत्या रेल्वेगाडीतून खाली पडून नाशिक येथील प्रवाशाचा गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला, तर दुसऱ्या घटनेत एक महिला रेल्वेडब्यात चढत असताना गंभीर जखमी झाली. योगेश दिलीप पाटील (वय ४०, रा. दाभाडी, नाशिक), असे मृत प्रवाशाचे नाव असून, अन्य एका घटनेत राधिका मोहन जाधव (वय ३५, रा. बडनेरा) या गंभीर जखमी झाल्याची माहिती बडनेरा (जीआरपी) रेल्वेच्या पोलिस निरीक्षक अर्चना गावडे यांनी दिली. नाशिकच्या दाभाडी येथील योगेश पाटील हे बल्लारशा येथील एका औषध निर्मितीच्या कंपनीमध्ये नोकरीला होते. ते बल्लारशावरून रेल्वेगाडीने नाशिक येथे जात होते. बुधवारी (ता.२२) मध्यरात्रीनंतर दीड ते पावणेदोनच्या सुमारास श्री. पाटील हे धावत्या रेल्वेमधून खाली पडले. बडनेरा ते अकोला रेल्वेमार्गावर ही घटना घडली. जीआरपी (रेल्वे) पोलिसांनी जखमी योगेश पाटील यांना उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. जखमीचा उपचारादरम्यान गुरुवारी (ता.२३) सकाळी आठच्या सुमारास मृत्यू झाला. बडनेरा रेल्वेस्थानकावर गुरुवारी (ता. २३) सकाळी साडेसात ते पावणेआठच्या सुमारास एका रेल्वे प्लॅटफॉर्मवर मालगाडी उभी होती. त्या मालगाडीच्या दुसऱ्या बाजूच्या प्लॅटफॉर्मवर लोकल ट्रेन उभी होती. ती ट्रेन पकडण्यासाठी राधिका मोहन जाधव (वय ३५) यांनी उभ्या असलेल्या मालगाडीच्या खालून जाण्याचा प्रयत्न केला. नेमकी त्याचवेळी मालगाडी सुरू झाली. त्यामुळे मालवाहू रेल्वेने कटल्यामुळे राधिका जाधव गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाल्याचे रेल्वे पोलिसांनी सांगितले. जखमी राधिका यांनाही रेल्वे पोलिसांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून, प्रकृती गंभीर आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# कंत्राटदाराविरोधात वारंवार तक्रारी, तरीही अधिकाऱ्यांची उदासीनता

## आरोग्यकेंद्रांना खासगी वाहनांचा अधिकार द्या!कंत्राटदाराचा मनमानी कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मेळघाट**

भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या वाहनांचे अधिकार मेळघाटातील प्राथमिक आरोग्यकेंद्रांना नसून जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला आहेत. ज्यामुळे कंत्राटदाराचा मनमानी कारभार सुरू आहे. तथापि, स्थानिक पातळीवर वाहनांची नियुक्ती करण्याचा अधिकार प्राथमिक आरोग्यकेंद्रांना दिल्यास स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि वेतनाच्या अडचणीही दूर होतील, अशी मागणी पुढे येत आहे.



मेळघाटातील दुर्गम भागात जेथे उपचार करण्यासाठी व दळणवळणाची साधने सहज उपलब्ध होत नाहीत, अशा ठिकाणच्या गर्भवती महिलांना प्रसूतीकळा सुरू झाल्यास रुग्णालयापर्यंत पोहोचणे अधिक जिकरीचे होते, याची दखल घेऊन आरोग्य विभागाने २५ जून १९९५ ला नवसंजीवनी योजनेंतर्गत भरारी पथकाची स्थापना केली होती. त्या योजनेंतर्गत डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली. सोबतच त्याच्यासाठी खासगी भाडेतत्त्वावर वाहनांची सोय उपलब्ध करून दिली, यामध्ये मेळघाटात २२ डॉक्टरांसाठी २२ खासगी वाहने उपलब्ध करून दिले आहेत. मात्र भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या वाहनांना लावण्याचा अधिकार हा जिल्हा परिषदेकडे असल्याने कंत्राटदाराचा मनमानी कारभार वाढत चालला आहे. मात्र याचा त्रास चालकांना तथा वाहनधारकांना होत आहे. त्यामुळे भरारी पथकात वाहने लावण्याचा अधिकार प्राथमिक आरोग्यकेंद्रांना दिल्यास कंत्राटदारांचा मनमानी कारभार थांबेल आणि वाहनचालक तथा वाहनधारकांना वेळेवर त्यांचे हक्काचे पेमेंट मिळेल, याकडे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

### बहुतेक ठिकाणचे वाहने बंद

मेळघाटच्या भरारी पथकातील काही आरोग्यकेंद्रांतील खासगी वाहने कंत्राटदारांच्या मनमानी कारभारामुळे बंद झाली आहेत. या बंद वाहनांमुळे डॉक्टरांना रुग्णांना रेफर करताना आणि दौरे करताना अडचणी जात आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आजपर्यंत अनेकदा कंत्राटदाराच्या तक्रारी वाहनधारक तथा चालकांकडून झाल्या आहेत. मात्र आताही कंत्राट त्यालाच दिला गेला. सदर वाहने स्थानिक पातळीवर लावण्याचा अधिकार दिला गेला, तर मेळघाटातील तरुणांना रोजगार उपलब्ध होईल अन् त्यांच्या वेतनाचा प्रश्नसुद्धा निर्माण होणार नाही. मात्र असे असतानाही आरोग्य विभागाचे अधिकारी निर्णय घेण्यास तयार नाहीत, यावर लवकरात लवकर कायमस्वरूपी तोडगा काढणे गरजेचे झाले आहे.

# हरदोली ग्रामपंचायतच्या पोटनिवडणुकीवर प्रश्नचिन्ह

## इच्छुकांना माहितीपासून वंचित ठेवल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धारणी–** धारणी तालुक्यातील हरदोली ग्रामपंचायतीतील पोटनिवडणुकीच्या प्रक्रियेवर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. ग्रामपंचायत हरदोलीच्या सरपंचांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर करीत पोटनिवडणुकीत नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप केला आहे. तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीतील रिक्त सदस्यपदांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीबाबत गावातील नागरिक, इच्छूक उमेदवार तसेच संबंधित पदाधिकारी यांना कोणतीही अधिकृत सूचना देण्यात आली नाही. निवडणुकीची नोटीस गावात




प्रसिद्ध करण्यात आली नसल्याने अनेक इच्छूक उमेदवारांना अर्ज दाखल करण्याची संधी मिळाली नाही. सरपंचांनी नमूद केले की, यासंदर्भात तलाठी, ग्रामपंचायत सचिव व ग्रामसेवक यांच्याकडे चौकशी केली असता समाधानकारक माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक माहिती दडवली असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकारामुळे ग्रामपंचायतीतील लोकशाही प्रक्रियेवर परिणाम झाला असून, पात्र उमेदवारांना अन्याय झाल्याचे सरपंचांनी तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे याप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीच्या प्रती अमरावती जिल्हाधिकारी, धारणीचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना पाठविण्यात आल्या असून, तहसीलदारांनी ग्रामसेवक व तलाठी यांना याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच चोवीस तासांत स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले. प्रशासनाकडून याप्रकरणाची काय दखल घेतली जाते, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# अमरावती-गोंदिया पहाटेची बस बंद झाल्याने प्रवाशांचे हाल

## ३० वर्षांची परंपरा खंडित;– मोझरी डेपोत धडकले निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मोझरी–** गेल्या ३० वर्षांपासून अविरत सुरू असलेली अमरावती-नागपूर-गोंदिया ही पहाटेची महत्त्वाची बस सेवा मागील दोन आठवड्यांपासून अचानक बंद करण्यात आली आहे. यामुळे या मार्गावरील हजारो प्रवाशांचे हाल होत असून, या निर्णयाविरोधात संताप व्यक्त करण्यासाठी प्रवाशांनी मोझरी बस डेपो व्यवस्थापक आणि विभागीय वाहतूक नियंत्रण, भंडारा यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

अमरावती मुख्य बसस्थानकावरून दररोज पहाटे ५:१५ वाजता सुटणारी ही बस अमरावती, गुरुकुंज मोझरी, तळेगाव, कारंजा, नागपूर आणि गोंदिया या महत्त्वाच्या शहरांना जोडणारी मुख्य दुवा आहे. विशेषतः नागपूर व गोंदिया येथे नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायानिमित्त जाणाऱ्यांसाठी ही बस अत्यंत उपयुक्त ठरत होती. ही सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता बंद केल्याने प्रशासनाविरोधात प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. परिणामी गुरुकुंज मोझरी येथील प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असलेल्या गुरुकुंज मोझरी येथे दररोज भाविकांची मोठी वर्दळ असते. पहाटे साडेपाचच्या सुमारास नागपूर, साकोली, नवेगाव आणि तिरोडा या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांची संख्या येथे लक्षणीय असते. मात्र, आता ही बस थांबत नसल्याने किंवा सेवाच बंद असल्याने प्रवाशांना नाईलाजास्तव खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून जास्तीचे भाडे मोजावे लागत आहे. नोकरदार वर्ग कामावर उशिरा पोहोचत आहे, तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने या विषयाची दखल घेऊन अमरावती-गोंदिया बसचा थांबा पूर्ववत करावा आणि ही जुनी बस सेवा पुन्हा सुरू करून प्रवाशांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्यासह किशोर खवले, जयंत निखाडे, रावसाहेब वानखेडे, गजानन ठाकरे, जयंत तायवाडे , भूषण विघ्ने , विनोद मेश्राम, मनोज वैद्य, अनिल मेश्राम, मनोहर आखरे प्रफुल बद्रे यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

### डेपोची स्वच्छता सुरक्षा धोक्यात

डेपोवरील थंड पाण्याचे वॉटर कुलर बंद आहे. पाण्याची टाकी गेल्या कित्येक वर्षांपासून धुतलीच नाही. त्याशिवाय, डेपोवर सीसीटीव्हीची सुरक्षा नाहीत, तर शौचालयामध्ये घाणीचे साम्राज्य आहे. सुरक्षा रक्षकाची रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ड्युटी असतांना ड्युटी बरोबर बजावत नसल्याचे स्वतः डेपो व्यवस्थापक यांनी सांगितले असून यासंदर्भात सुधारणा न आल्यास आंदोलन करण्याचा इशारा प्रशांत कांबळे यांनी दिला आहे.

# राठी जीन परिसरात भीषण आग; नगरपरिषद अग्निशामक दलाची तत्परता, मोठी दुर्घटना टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धा. रेल्वे–**

धामणगाव परिसरातील राठी जीन भागात आज २४ एप्रिल (शुक्रवार) रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. आजूबाजूला दाट रहिवासी वस्ती असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घटनास्थळी गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ धामणगाव नगरपरिषद अग्निशामक दलाला कळविले. माहिती मिळताच अग्निशामक दलाचे जवान त्वरित घटनास्थळी दाखल झाले. लीडिंग फायरमॅन सचिन कट्यारमल यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश उईके, प्रशांत रोकडे व हेमंत कापसे व माजी अग्निशामक ड्रायव्हर गजाननक कोयते यांनी





प्रसंगावधान राखत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.अथक प्रयत्नांनंतर काही वेळातच आगीवर यशस्वीरित्या नियंत्रण मिळवण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आहे .ही दिलासादायक बाब आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, स्थानिक नागरिकांनी अग्निशामक दलाच्या वेगवान आणि धाडसी कारवाईचे कौतुक केले असून, त्यांच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त केली आहे.

**तळेगाव ठाकूर शिवारात आग; शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला–** तळेगाव ठाकूर येथील मौजा तिवसा भाग २ च्या शेतशिवारात आज सकाळी अचानक आग लागल्याची घटना घडली.

ज्या ठिकाणी आग लागली ते शेत पडीत असल्याचे समजते. जवळच शेतात काम करत असताना रमेश राऊत यांना आग लागल्याचे दिसताच त्यांनी तातडीने शेजारच्या शेतकऱ्यांना माहिती दिली तसेच तिवसा नगरपंचायत अग्निशमन दलाला कळविण्यात आले.मात्र, शेताकडे जाणारा रस्ता खराब असल्यामुळे अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचू शकली नाही. अशा परिस्थितीत स्थानिक शेतकरी व युवकांनी धाडस दाखवत स्वतःच आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले.मनोज वानखडे, सुनिल टाले, शंकर बावरी, अजय खंडारे, अनिकेत तिजारे, बालवीर उगोकार, विकास श्रीखंडे, संचित गोडबोले आणि ऋतिक सिंग बावरी यांनी अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.ज्या पडीत शेतात आग लागली होती, त्यालगतच्या शेतात सागवानाची झाडे असल्यामुळे मोठ्या नुकसानाची शक्यता होती. मात्र शेतकरी व युवकांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे शेतशिवारातील खराब रस्त्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून आपत्कालीन परिस्थितीत सुविधा उपलब्ध करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# रासायनिक खतांचा संतुलित वापरासाठी कृषी विज्ञान केंद्राची जनजागृती मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शेती अधिक उत्पादनक्षम, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक व्हावी या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) तर्फे रासायनिक खतांचा संतुलित वापर आणि जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. ७ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेली ही मोहीम सध्या २५ हून अधिक गावांमध्ये पोहोचली असून शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.सद्यस्थितीत अनेक शेतकरी डीएपी व युरियाचा अती वापर करत असल्याने जमिनीतील अन्नद्रव्यांचे संतुलन बिघडत आहे. यामुळे मातीची गुणवत्ता घटून उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या समस्येवर उपाय म्हणून शास्त्राधारित खत




व्यवस्थापनाचा संदेश या मोहिमेद्वारे दिला जात आहे.केंद्राचे प्रमुख डॉ. के. पी. सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी मेळावे, प्रात्यक्षिके, शेतशाळा आणि गटचर्चा आयोजित केल्या जात आहेत. शेतकऱ्यांना जैविक खतांचे फायदे, सूक्ष्मजीवांचे महत्त्व तसेच माती परीक्षणाचे आवश्यकत्व पटवून दिले जात आहे. माती तपासणी केल्याशिवाय खतांचा वापर करू नये हा मुख्य संदेश प्रभावीपणे पोहोचविला जात आहे.विषय तज्ज्ञ डॉ. हर्षद ठाकूर यांनी संतुलित खत वापर, योग्य प्रमाण, वेळ आणि पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. हिरवळीचे खत, कंपोस्ट, शेणखत, जीवामृत यांसारख्या सेंद्रिय उपायांचा अवलंब करण्याचेही आवाहन करण्यात आले. तसेच रायझोबियम, अझाटोबॅक्टर यांसारख्या जैविक खतांच्या वापरावर भर देण्यात आला.या मोहिमेमुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होऊन शेती अधिक शाश्वत व नफ्याची होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पुढील काळात ही मोहीम अधिक गावांमध्ये राबवून माती वाचवा – शेती वाचवा हा संदेश प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

# ‘नो-टोबॅको’ मोहिमेला यश; जिल्ह्यात ८१८ जणांवर कारवाई, १.०९ लाख दंड वसूल

## समुपदेशनातून ३३२ जणांनी सोडले तंबाखूचे व्यसन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती –** जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या पुढाकारातून अमरावती जिल्ह्यात तंबाखूविरोधी मोहिमेला मोठे यश मिळत असून, एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत तंबाखू नियंत्रण कायदा २००३ अंतर्गत तब्बल ८१८ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईतून एकूण १,०९,२७७ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून, प्रशासनाच्या कठोर भूमिके सोबतच जनजागृती मोहिमेलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.या दंडाच्या रकमेत आरोग्य विभागाने २२,९७५ रुपये, तर पोलीस विभागाने ८६,३०२ रुपये शासनाच्या खात्यात जमा केले आहेत. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणे किंवा थुंकणे हे कायद्याने दंडनीय गुन्हे असल्याने संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. प्रत्येक प्रकरणात २०० रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येतो.राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम २००७-०८ पासून सुरू असून, अमरावती जिल्ह्यात तो मार्च २०१६ पासून प्रभावीपणे राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत केवळ कारवाईच नव्हे, तर समुपदेशन आणि जनजागृतीवरही विशेष भर देण्यात आला आहे. वर्षभरात ९,२२८ नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले, त्यापैकी ३३२ जणांनी तंबाखूचे व्यसन यशस्वीपणे सोडले आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.जिल्हा रुग्णालयामार्फत चालविण्यात येणाऱ्या तंबाखू मुक्ती समुपदेशन केंद्रांमुळे अनेकांना व्यसनमुक्तीचा मार्ग सापडत आहे. समुपदेशक उद्धव जुकरे यांनी सांगितले की, सार्वजनिक ठिकाणी तंबाखू सेवन करणाऱ्यांवर कारवाईसोबतच समुपदेशनाद्वारे त्यांना व्यसन सोडण्यासाठी प्रेरित केले जात आहे.तंबाखूमुक्त समाज घडविण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्येही व्यापक जनजागृती करण्यात आली. ‘तंबाखू मुक्त शैक्षणिक संस्था’ उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील १५२ शाळांमध्ये कार्यक्रम घेण्यात आले, ज्यात २४,६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याशिवाय ३५० शाळांना पोस्टर व बॅनर वाटप करून तंबाखूमुक्त वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.सार्वजनिक ठिकाणी जनजागृतीसाठी शासकीय कार्यालये, बसस्थानके, रुग्णालये आदी ४९६ ठिकाणी पोस्टर व बॅनर लावण्यात आले. स्वच्छता गाड्यांद्वारे संदेश प्रसारित करण्यात आले, तर रुग्णालयांमध्ये माईक व टीव्हीद्वारेही जनजागृती



करण्यात आली.तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी विविध विभागांच्या २५४ अधिकारी-कर्मचाऱ्यांना सात प्रशिक्षण सत्रांद्वारे प्रशिक्षित करण्यात आले. तसेच रुग्णालयांमध्ये ४४३ गटचर्चांचे आयोजन करून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत माहिती देण्यात आली.विविध राष्ट्रीय दिनांच्या निमित्ताने १५९ ठिकाणी तंबाखूमुक्ती शपथ कार्यक्रम आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये १८,३४६ नागरिकांनी सहभाग घेतला. ३१ मे ‘जागतिक तंबाखू विरोधी दिना’निमित्त विशेष मोहिमा, रॅली, मुख तपासणी शिबिरे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी नागरिकांना आवाहन केले की, तंबाखूजन्य पदार्थांमुळे गंभीर आजार उद्भवतात. त्यामुळे नागरिकांनी तंबाखूचे सेवन टाळावे. प्रशासनाकडून जनजागृतीसोबतच कठोर कारवाईही सुरूच राहणार आहे.तंबाखूविरोधी मोहिमेत कारवाई आणि जनजागृती या दुहेरी उपाययोजनांमुळे अमरावती जिल्हा तंबाखूमुक्तीच्या दिशेने ठोस पावले टाकत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# 'बोगस बियाण्यांचा सापळा' पुन्हा सक्रिय!

## कोट्यवधींचा खेळ; जास्त उत्पन्नाच्या आमिषाला शेतकरी बळी पडण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती–** जिल्ह्यात खरीप हंगामाची चाहूल लागताच बियाण्यांच्या बाजारात पुन्हा एकदा 'बोगस बियाण्यांचे जाळे' सक्रिय झाले आहे. जास्त उत्पन्नाचे आमिष, कमी दराचा मोह आणि आकर्षक जाहिरातींच्या आड लपलेला हा फसवणुकीचा खेळ शेतकर्‍यांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. जिल्ह्यातील शेती पूर्णपणे खरीप हंगामावर अवलंबून असल्याने कपाशी, सोयाबीन आणि तूर या पिकांच्या पेरणीसाठी शेतकरी सज्ज होत आहेत. मात्र, सीमेलगतच्या तेलंगण आणि आंध्र प्रदेश या राज्यांतून चोरट्या मार्गाने येणार्‍या बोगस बियाण्यांचा मोठा पुरवठा होत असल्याने धोका वाढला आहे. 'जास्त उत्पादन, कमी खर्च' या गोड बोलण्याला भुलून अनेक शेतकरी नकळत या सापळ्यात अडकत आहेत. गेल्या काही वर्षांत बोगस बियाण्यांमुळे अनेकांना नापिकीचा फटका बसला असून शेती तोट्याची ठरली आहे. प्रशासनाकडून कारवाई होत असली तरी ती केवळ गुन्हे नोंदविण्यापुरती मर्यादित राहिल्याने या साखळीला आळा बसलेला नाही. यंदा खरीपपूर्व काळातच



कृषी विभागाने पथके सज्ज केली असून सीमावर्ती भागात विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या विक्रीत मोठ्या प्रमाणावर उलाढाल होत असल्याने या काळात बोगस माल विकून अधिक नफा कमावण्याचा प्रकार वाढतो. त्यामुळे प्रशासनाने कठोर पावले उचलली नाहीत तर विक्रेते पुन्हा संधीचे सोने करतील, अशी भीती व्यक्त होत आहे. खरीप हंगामाच्या उंबरठ्यावर शेतकर्‍यांनी सजग राहणे अत्यंत गरजेचे आहे. स्वस्ताच्या आमिषाला बळी पडण्याऐवजी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करणे, पावती घेणे आणि संशयास्पद व्यवहार त्वरित कळविणे, हेच नुकसान टाळण्याचे प्रभावी शस्त्र ठरणार आहे.जिल्ह्यात पथके तयार जिल्ह्यात पथके तयार करण्यात आली असून बोगस बियाण्यांवर लक्ष ठेवले जात आहे. शेतकर्‍यांनी पावतीशिवाय बियाणे खरेदी करू नये. संशयास्पद विक्रीची माहिती दिल्यास तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# तांत्रिक खोळंब्यामुळे नवी मतदान नोंदणी रखडली

## निवडणूक आयोगाच्या 'पोर्टल'चा तांत्रिक खोळंबा; युवकांना मतदानापासून वंचित राहण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती–**



लोकशाही बळकट करण्यासाठी 'प्रत्येक मत मोलाचे' असल्याचा प्रचार निवडणूक आयोगाकडून मोठ्या प्रमाणावर केला जात असला, तरी प्रत्यक्षात मात्र आयोगाच्या तांत्रिक दिरंगाईमुळे नवीन मतदारांची कोंडी होत आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या, विशेषतः २००६ नंतर जन्मलेल्या तरुणांची नोंदणी करताना निवडणूक विभागाच्या पोर्टलवर तांत्रिक अडचणी येत असल्याने तालुक्यासह जिल्ह्यातील लाखो तरुण मतदानापासून वंचित राहण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

या संदर्भात तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाकडे विचारणा केली असता, हा तांत्रिक प्रश्न असून, आम्ही वरिष्ठ कार्यालयाला कळवले आहे, असे उत्तर दिले जात आहे. मात्र, निवडणुका तोंडावर असताना गेल्या दोन वर्षांपासून ही यंत्रणा अपडेट का झाली नाही? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. तांत्रिक चुकांमुळे जर तरुण मतदानापासून वंचित राहिले, तर त्याला जबाबदार कोण? असा संताप युवक व्यक्त करत आहेत.

### बीएलओ सुद्धा हतबल

दोन वर्षांपासून समस्या कायम! निवडणूक प्रक्रियेत गावपातळीवर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार्‍या तालुक्यातील बीएलओ यांनी प्रशासकीय स्तरावरील त्रुटींवर स्पष्टपणे बोट ठेवले आहे. त्यांच्या मते, नवीन मतदारांची नाव नोंदणी करण्यासाठी आयोगाची जी वेबसाईट किंवा सॉफ्टवेअर वापरले जाते, ते गेल्या दोन वर्षांपासून अद्ययावत करण्यात आलेले नाही. ज्या तरुणांचा जन्म ऑक्टोबर २००६ नंतरचा आहे, त्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झाले असूनही तांत्रिक कारणामुळे त्यांचे नाव पोर्टलवर स्वीकारले जात नाही.

# बाजार समितीत मोठा स्फोट! १७ संचालक अपात्र

## अंजनगावच्या राजकारणाला जबर धक्का, जिल्हा उपनिबंधकांचा धडाकेबाज निर्णय

### नियमभंगावर कडक कारवाई, नव्या निवडणुकांची चाहूल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सत्ताकारणात मोठा भूकंप झाला असून, तब्बल १७ विद्यमान संचालकांना जिल्हा उपनिबंधकांनी अपात्र ठरवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सहकार क्षेत्रात क्वचितच दिसणाऱ्या या कठोर कारवाईमुळे तालुक्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. नियमभंग, अधिकारांचा गैरवापर आणि कायदेशीर तरतुदींकडे केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ आणि संबंधित नियमांच्या आधारे हा निर्णय दिला. विशेष म्हणजे, ही कारवाई एखाद्या किरकोळ तक्रारीवर नव्हे, तर सातत्याने होत असलेल्या गंभीर उल्लंघनांच्या पुराव्यांवर आधारित असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणाची सुरुवात शरद रावसाहेब साबळे, विनायक





सदाशिव वाघ आणि सुधीर गोपाळराव अढाऊ यांनी दाखल केलेल्या तक्रारीपासून झाली. त्यांनी बाजार समितीच्या कामकाजात मोठ्या प्रमाणावर अनियमितता, नियमांचे उल्लंघन आणि प्रशासनिक पारदर्शकतेचा अभाव असल्याचे आरोप केले होते. या तक्रारीची गंभीर दखल घेत जिल्हा उपनिबंधकांनी सखोल चौकशी सुरू केली.चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. समितीच्या संचालकांनी अधिनियमातील कलम ६(१), ११, २९, ३१(१) आणि ५७(२) तसेच नियम ३२, ५९, १००, ११६ आणि ११८ यांचे वारंवार उल्लंघन केल्याचे पुराव्यांवरून स्पष्ट झाले. महत्त्वाचे म्हणजे, ही उल्लंघने एकदाच नव्हे तर सातत्याने होत असल्याचे आढळले. त्यामुळेच नियम १०(१)(आय) अंतर्गतड.जयंत गुणवंतराव साबळे सभापती,सुरेश नारायणराव राऊत,विकास मनोहरराव येवले,सागर वासुदेवराव घोगरे,अविनाश दादाराव सदार,विजय दत्तात्रयजी कळमकर,शारदाताई संजयराव ढोक,पुनमताई अमोल पोटे,सुरेश रामदास आडे,विशाल मधुकरराव पंडीत,अनंतराव हिंमतराव रोकडे,अमर प्रल्हादराव शिंगणे,प्रदिप सुदामराव इंगले,चंद्रशेखर श्रीरामजी शेळके,शंकरराव धन्नुजी चोरे,संजय रामकृष्ण काळमेघ,शेख जमील शेख रहेमान या सर्व जणांना अपात्र ठरवण्याचा निर्णय घेण्यात आला.नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार सर्व संबंधित संचालकांना आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी देण्यात आली होती. मात्र, त्यांनी सादर केलेले स्पष्टीकरण, कागदपत्रे आणि युक्तिवाद हे आरोप खोडून काढण्यात अपयशी ठरले.

परिणामी, १७ही संचालकांना पदावर राहण्यास अयोग्य ठरवण्यात आले.या निर्णयामुळे बाजार समितीचे विद्यमान सत्ताकेंद्र कोलमडण्याच्या मार्गावर आले आहे. राजकीय दृष्ट्या प्रभावशाली मानल्या जाणाऱ्या अनेक चेहऱ्यांना या कारवाईचा फटका बसला आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची जुळवाजुळव सुरू होण्याची शक्यता आहे.दरम्यान, या कारवाईकडे शेतकरी वर्गाने उशिरा का होईना, न्याय मिळाला अशा प्रतिक्रिया देत स्वागत केले आहे. बाजार समित्यांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी ही कारवाई टर्निंग पॉईंट ठरू शकते, अशी भावना व्यक्त होत आहे.या प्रकरणाचे पडसाद केवळ अंजनगावपुरते मर्यादित न राहता संपूर्ण जिल्ह्यात उमटण्याची चिन्हे आहेत.

> दरम्यान, अपात्र ठरवलेले संचालक उच्चस्तरीय प्राधिकरणाकडे अपील दाखल करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर अपील झालेच, तर या प्रकरणाला आणखी राजकीय रंग चढण्याची शक्यता नाकारता येत नाही.
>
> एकूणच, अंजनगाव सुर्जी बाजार समितीतील ही कारवाई केवळ प्रशासकीय निर्णय नसून, स्थानिक राजकारणातील सत्तासमीकरणे बदलणारी ठरू शकते. आगामी काळात नव्या निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता असून, कोणाच्या हातात जाणार बाजार समितीचा कारभार? हा प्रश्न आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# केरोसीन वाटप कागदावरच

## पुरवठा रखडला लाभार्थ्यांना प्रतीक्षा कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

आखाती देशांमध्ये भडकलेल्या युद्धामुळे एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने केंद्र शासनाने केरोसीन वाटपाचा निर्णय घेतला होता. याबाबत २५ मार्च २०२६ रोजी शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने अंत्योदय व प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना केरोसीन वाटपासाठी शासन निर्णय सुद्धा जारी केला होता. परंतु शासन निर्णय जारी होऊन जवळपास एक महिना होत असला तरी अद्याप शासनाकडून केरोसीनचा पुरवठा करण्यात आला नाही. त्यामुळे शासनाचे केरोसीन वाटपाचे धोरण कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.

दुसरीकडे सिलिंडर मिळत नसल्याने काही गॅस एजन्सीबाहेर लाभार्थ्यांची गर्दी अद्यापही पाहायला मिळत असून लाभार्थी सिलिंडरसाठी वणवण भटकत असल्याचे वास्तव आहे. राज्यात गत काही वर्षांपासून पंतप्रधान उज्ज्वला योजना व इतर योजनांद्वारे एलपीजी गॅस कनेक्शन मोठ्या प्रमाणात वितरीत करण्यात आले आहेत. त्यानुसार, गॅस कनेक्शन



असणाऱ्या कुटुंबांना केरोसीन वितरण न करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.१६/२०१४ मध्ये दि. ७.०१.२०१६ रोजी आदेश दिले होते. त्यामुळे राज्यभरात केरोसीनचे अत्यंत मर्यादित स्वरुपात वितरण करण्यात येते. परंतू, सद्यस्थितीत भू-राजकीय परिस्थितीमुळे एलपीजीचा तुटवडा जाणवत असल्याने केंद्र शासनाने १२ मार्च २०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्यास ३७४४ कि.ली. एवढे नियतन मंजूर केले होते. त्यानुषंगाने एलपीजीला पर्यायी इंधन म्हणून तात्पुरत्या स्वरुपात केरासीन वितरण करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने केरोसीनचा कोटा सुद्धा मंजूर केला आहे. परंतु अद्याप केरोसीनचा पुरवठा न झाल्याने केरोसीन वाटप कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.

# अक्षता टाकण्यापूर्वीच काळाचा घाला!

## वाशीममध्ये भीषण अपघात; आई-वडिलांसह १२ वर्षांच्या मुलाचा अंत

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२४अकोला :** नातेवाईकांकडील लग्नामध्ये आनंदाने सहभागी होऊन वधू-वराच्या डोक्यावर अक्षता टाकण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर मार्गातच काळाने घाला घातला. २४ एप्रिल रोजी नियोजित लग्नासाठी गुरुवारी सायंकाळी दुचाकीने निघालेल्या कुटुंबाला मालवाहू मोटारीने जोरदार धडक दिल्याची घटना वाशीम जिल्ह्यातील वाशीम-मंगरुळपीर मार्गावर पार्डी टाकमोर फाट्याजवळ घडली. या भीषण अपघातात आई-वडिलांसह मुलाचाही करुण अंत झाला. या दुर्घटनेमुळे आनंदावर विरजण पडले असून परिसरात शोककळा पसरली आहे.वाशीम जिह्यातील वारा जहागीर येथील रहिवासी संतोष बबन लांभाडे (४२), त्यांच्या पत्नी कलावती संतोष लांभाडे (३५) आणि मुलगा ईश्वर संतोष लांभाडे (१२) हे तिघे आपल्या नातेवाईकाच्या लग्नासाठी तांदळी शेवई येथे जात होते. २४ एप्रिलला सकाळी हे लग्न होणार होते. लग्नासाठी घरातून निघालेल्या या कुटुंबाचा प्रवास अर्ध्यावरच संपला. पार्डी टकमोर फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीला आंब्यांने भरलेल्या भरधाव मालवाहू वाहनाने समोरून जोरदार धडक दिली.



भीषण अपघातात तिघेही फेकल्या गेले

मालवाहू मोटारीची दुचाकीला अत्यंत वेगात धडक बसली. दुचाकीवरील लांभाडे दाम्पत्य आणि त्यांचा १२ वर्षांचा मुलगा ईश्वर हे तिघेही रस्त्यावर फेकल्या गेले. गंभीर दुखापत झाल्याने या तिघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. लग्नासाठी घराबाहेर पडलेल्या कुटुंबाचा भीषण अपघातात अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले. मन हेलावून टाकणाऱ्या या घटनेमुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# जनगणनेच्या कार्यात नागरिकांना प्रत्यक्ष सहभागाची संधी; देशातील पहिल्या 'डिजिटल जनगणने'साठी अमरावती जिल्हा सज्ज

## 'स्व-गणना' सुविधेचा लाभ घेण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

भारताची लोकसंख्या गणना २०२७ मध्ये घेण्याचा निर्णय जाहीर झाला असून यावेळची जनगणना ही स्वतंत्र भारताची आठवी आणि २१ व्या शतकातील तिसरी जनगणना असणार आहे. विशेष म्हणजे ही भारताची पहिली 'डिजिटल जनगणना' असेल. या ऐतिहासिक प्रक्रियेत नागरिकांना प्रत्यक्ष सहभाग नोंदवता यावा यासाठी 'स्व-गणना' (डशश्रष-एर्पीाशीरींळेप) ही सुविधा पहिल्यांदाच उपलब्ध करून देण्यात आली असून, अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पत्रकार परिषदेत केले.

ही जनगणना दोन स्वतंत्र टप्प्यात पार पडणार असून पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना, तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्या गणना केली जाईल. स्व-गणनेसाठी १ मे २०२६ ते १५ मे २०२६ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. नागरिकांनी शासनाच्या अधिकृत हीींिं:// ीश.लशपीीी.सीें.ळप या वेबपार्टलवर आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून कुटुंबाची माहिती भरायची आहे. यासाठी आधार कार्ड किंवा मोबाईल नंबरच्या आधारे लॉगिन करून एकूण ३३ प्रश्नांची अचूक उत्तरे देणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय





असून नागरिकांनी कोणत्याही क्यूआर (ठ) कोड स्कॅन करू नये किंवा बँक खाते, पॅन कार्डचा तपशील कोणालाही देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

अमरावती जिल्ह्याच्या नियोजनाबाबत सांगायचे झाले तर, ग्रामीण व शहरी भागात एकूण ४,४९९ घरयादी गट बनविण्यात आले आहेत. या कार्यासाठी ६८ क्षेत्र प्रशिक्षक, ४,६३९ प्रगणक आणि ८१३ पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून त्यांचे प्रशिक्षण सध्या सुरू आहे. जे नागरिक तंत्रज्ञान वापरू शकत नाहीत किंवा ज्यांनी स्व-गणना केलेली नाही, त्यांच्यासाठी प्रशिक्षित प्रगणक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रत्येक घरी भेट देऊन पद्वारे माहितीची नोंद करतील. ज्यांनी आधीच स्व-गणना केली आहे, त्यांनी प्रगणकांना फक्त आपला 'डए खऊ' द्यावा.

जनगणनेतून मिळणारी आकडेवारी पुढील १० वर्षांसाठी शाळा, दवाखाने, पाणीपुरवठा आणि रोजगार यांसारख्या विविध विकास आराखड्यांचे नियोजन ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, विशेषतः सुशिक्षित तरुणांनी पुढाकार घेऊन या राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. काही तांत्रिक अडचण आल्यास स्थानिक तहसील कार्यालय किंवा नगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधावा.-

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

